# पटकी

भाग १



पटकी हा एक रोग आहे.

यालाच 'कॉलरा' म्हणतात.
पटको झाली की
अचानक उलट्या सुरू होतात.
सारखे पातळ जुलाब होतात.

लगेच उपाय केला नाही तर
काही तासातच रोगी मरतो.

© होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र, मुंबई ४००००५
प्रकाशक: इंडियन इंस्टिट्यूट ऑफ एज्युकेशन
पुणे ४११०२९

उलट्या झाल्या, जुलाब झाले की अंगातले पाणी जाते.

रोग्याला थकवा येतो.
लगेच उपाय केला नाही तर
रोगी दगावतो.







पटकी का होते?
पटकी जंतूंमुळे होते.
हे जंतू पाण्यातून पोटात जातात.

पावसाळ्यात नवे पाणी येते.
हे पाणी लाल असते कारण त्यात घाण असते.



जत्रेच्या ठिकाणी गर्दी असते.
उघड्यावर अन्नाचा बाजार असतो.
खूप गर्दी झाली की खूप घाण होते.

पटकी भराभर पसरते.

पटकी टाळता येते.

पाणी गाळून घ्या. उकळून प्या.
पटकीचे जंतू मरून जातील.
पटकी होणार नाही.



पाणी येते, जत्रा भरते तेव्हा
पटकीची लस टोचून घ्या.
साथ येईपर्यंत थांबू नका.
आधीच टोचून घ्या.

सरकारी डॉक्टर मोफत लस टोचतात.

इतके करून पटकी झालीच तर लगेच दवाखान्यात जा.